ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | रा. रं. बोराडे यांची पाचोळा आणि आनंद यादवांची कादंबरीतील बोलीचे स्वरूप<br>**प्रा. डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते** | १-८ |
| २ | ना. धो. महानोरांच्या 'पानझड' मधील कवितांचे भाषिक वेगळेपण<br>**मारोती रामराव कोल्हे** | ९-१२ |
| ३ | बंजारा गोर बोली आणि सांस्कृतिक संदर्भ<br>**प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव** | १३-१६ |
| ४ | लोकसाहित्याचे वाहक बोलीभाषा<br>**प्रा. डॉ. पदमाकर आ. पिटले** | १७-२३ |
| ५ | बोली भाषेचे साहित्याला योगदान<br>**प्रा. नवनाथ ज्ञानोबा पवळे** | २४-२७ |
| ६ | झाडी बोलीचे साहित्याला योगदान<br>**प्रा. डॉ. संजय खाडप** | २८-३० |
| ७ | बोली भाषा आणि प्रमाण भाषा<br>**प्रा. अहिरे आर. एम.** | ३१-३३ |
| ८ | साहित्याच्या संदर्भात बोलीभाषांच्या अभ्यासामागची भूमिका<br>**प्रा. डॉ. धायगुडे आर. बी.** | ३४-३६ |
| ९ | मराठी बोलीभाषेतील दलित नाटय चळवळ<br>**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे** | ३७-३९ |
| १० | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**विना रमेश गुलदेवकर** | ४०-४३ |
| ११ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**उत्तम पुंडलीकराव सुपारे** | ४४-४६ |
| १२ | बोलीभाषेचे साहित्याला योगदान<br>**डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर** | ४७-५० |
| १३ | ओवी गीतातील बोली भाषा<br>**प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे** | ५१-५३ |


Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ९. मराठी बोलीभाषेतील दलित नाटय चळवळ

**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे**
मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता. गेवराई.

संपूर्ण कालखंडामध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये अनेक बदल घडून आलेले दिसतात. यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरलेले आहेत. प्रामुख्याने मराठी रंगभूमीचा विचार केला असता असे दिसून येते की, मराठी रंगभूमीवर जे प्रवाह आले, त्यात काही परंपरेच्या बाजूने राहिले तर काहींनी परंपरेच्या विरोधी जाण्याचे धाडस दाखविले त्यामुळे मराठी रंगभूमीवर नव-नव्या कल्पना, दिशा निर्माण झालेल्या आहेत.

गतकाळातील रंगभूमीचा विचार केला असता विष्णुदास भावेंच्या काळापासून सुरुवात झाली असे नमूद करावे लागते परंतु पुढे राजाश्रय कमी होत गेला आणि नाट्यसृष्टीला अवकळा आली. तद्नंतर किलोस्करांनी इंग्रजी, उर्दू नाटकांच्या प्रेरणांपासून मराठी नाट्यसृष्टीला उर्जितावस्था प्राप्त करून दिली. त्यानंतर मामा वरेरकर, मो.ग. रांगणेकर यांसारख्या नाट्य लेखकांनी मराठी नाट्यसृष्टीला सावरण्याचा प्रयत्न केला. रंगभूमी हा संमीश्र असा कलाप्रकार आहे. साहित्य, दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य, प्रकाश योजना, रंगभूषा, नृत्य, संगीत, चित्र या माध्यमातून हा कलाप्रकार रसिकांपर्यंत पोहचत असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात समता प्रस्थापित होण्याऐवजी गरीब-श्रीमंत दरी वाढून विषमता अधिक प्रमाणात भेडसावू लागली. ही बाब सर्व दृष्टीकोनातून अस्वस्थ करणारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मचक्र प्रवर्तनामुळे उपेक्षित जीवन जगत असलेल्या समाजामध्ये चेतना निर्माण झाली. पुढे शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले आणि उपेक्षित मानला गेलेला वर्ग लिहू, वाचू लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेला दीक्षा समारंभ, १९६० मध्ये झालेली महाराष्ट्र राज्याची स्थापना, पुढाऱ्यांचा संधीसाधुपणा, राजकीय सत्ता आणि जातीयतेला मिळणारे खतपाणी, महागाई, दुष्काळ, औद्योगिकता, गरिबी, बेकारी यामुळे येणारे नैराश्य, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, सवर्ण-दलित, ग्रामीण-शहरी यामध्ये वाढलेले अंतर या सर्व घटनांचे पडसाद तत्कालीन तरुण पिढीवर उमटले यामुळे मार्क्सवाद, अस्तित्ववाद, देशीवाद, स्त्रीवाद असे नवीन साहित्य व समीक्षा प्रवाह उदयाला आले आणि या सर्वांचे पडसाद मराठी नाटकांवर उमटले.

प्रस्तूत कालखंडात नाटकाचा चेहरामोहराच बदलून गेला. नाट्यकृतींनी अनेक वळणे घेतलेली आहेत. दलित साहित्याच्या उदयानंतर कविता, कथा, कादंबरी व आत्मकथनांच्या पाठोपाठ प्रारंभी संथगतीने का होईना दलित नाटकांचा प्रवास सुरु झाला. दलित साहित्यातील एक भव्य दालन म्हणजे त्या दलित नाटक होय. नाटक हा एक लोकसंवादी प्रकार असल्यामुळे त्याचा प्रेक्षकांवर जास्त परिणाम होत असतो. याप्रसंगी असे म्हणता येईल की, दलित नाटकाने दलित चळवळीला माणसांपर्यंत पोहोचविले. स्वातंत्र्यपूर्व काळापेक्षा स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी नाट्यकलेवर अधिक प्रमाणात लिखाण झालेले दिसते. या काळात दलित रंगभूमी, कामगार रंगभूमी, बाल रंगभूमीसारखे प्रवाह उदयाला आलेले दिसतात. तसेच पौराणिक व ऐतिहासिक



Scanned with CamScanner

विषयापेक्षा वास्तवतेला धरून नाट्य लेखन झाले. दलित रंगभूमीचा विचार करावयाचा असेल तर त्यासाठी काय करावे, याविषयी वि.भा. देशपांडे म्हणतात, 'दलित नाटकांनी प्रस्थापित रंगमंच सोडून जनसामान्यांच्या स्तरावरची वाट स्वीकारायला हवी, त्यांच्याशी जवळीक साधणारी, संवाद करणारी लेखन पद्धती आणि पर्यायाने प्रयोग पद्धती आत्मसात करायला हवी. अन्यथा ढोबळ, भडक रचना एवढीच गोष्ट शिल्लक राहील. दलित जीवनानुभवावर नाट्यरचना करताना जरी कलावादी भूमिका मान्य नसली, तरी एक गोष्ट निश्चित आहे की, नाट्यलेखन हे अखेर रचनाच असते. त्याचे भान ठेवायला हवे. जर ती रचना रंगमंचावरून शेकडो लोकांपर्यंत पोहचवायची असेल तर नाट्यलेखनाची स्वत:ची एक तर्कचौकट आहे. ती आत्मसात करावी लागेल. प्रस्थापित तंत्र नाकारून वेगळे तंत्र निर्माण करावयाचे म्हटले तरी मूळ माध्यमाची ताकद, मर्यादा जाणून घ्यायलाच हवी. त्याशिवाय रंगभूमीचा प्रवाह विकसीत होणार नाही.'

मराठी रंगभूमीवर इतर प्रवाहांसोबत दलित रंगभूमीचा प्रवाह अत्यंत महत्त्वाचा ठरतो. याची सुरुवात आपणास १८८५ मध्ये लिहिलेल्या महात्मा फुलेंच्या 'तृतीय रत्न' या नाटकाने झाल्याचे दिसून येते. महात्मा फुलेंच्या 'तृतीय रत्न' या नाटकानंतर म.भि. चिटणीसांचे 'युगयात्रा' हे नाटक दलित रंगभूमीवर आले. या कलाकृतींनी स्वत:चा एक स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे. यापुढे दलित रंगभूमीवर अनेक नाटके लिहिल्या गेली आणि त्यामधून दलित समाजाचे प्रबोधन केल्या गेले.

स्वातंत्र्यानंतर मराठवाड्यातील नाटक शैक्षणिक परिसरात विकसीत झालेले दिसते. या दृष्टिकोनातून विचार केला असता नाटकांसाठी शैक्षणिक परिसर ही भूमी लाभणं ही एका अर्थाने फार मोठी घटना आहे. ती एक प्रयोगशाळाच असते. त्या ठिकाणी निरीक्षण, नोंदी करायच्या असतात. शैक्षणिक परिसरात विकसनशील, प्रयोगशील राहिलेले नाटक याच भूप्रदेशामध्ये दिसून येते. 'झुलते मनोरे' आणि 'युगयात्रा' या दोन्ही नाटकांचा उल्लेख करणे यानिमित्त अगत्याचे ठरते. 'युगयात्रा'ची निर्मिती, रंगमंच, प्रेक्षकवर्ग, सादरीकरण इ. नी जागतिक विक्रम नोंदविला आणि आधुनिक दलित नाट्य चळवळीचा पाया घातला. मराठवाड्यातील बहुतांश नाटककार समकालीन वास्तवाला, प्रश्नाला थेट भिडताना दिसतात. प्रश्नांच्या मुळाशी संघर्ष असतो, त्याची अनेक रूपे असतात. कधी तो मानसिक, सामाजिक, राजकीय, संस्कृतिक तर कधी धार्मिक असतो. अशा संघर्षांचे वास्तव नाटककरांना आव्हान देत असते. याच बरोबर वर्तमान जीवनातील असुरक्षितता आणि अनिश्चिततेने घेतलेली वळणे, त्या वळणांमागील झुंडशाहीचा दबदबा, सामान्य माणसांची कुत्तरओढ, अगतिकता, भीती आणि भीतीपोटी निर्माण झालेली अस्वस्थता दलित नाट्यकलाकृतींमधून व्यक्त होते.

दलित रंगभूमीला एक वैचारिक अधिष्ठान लाभले आहे. कोणतीही चळवळ, प्रवाह व साहित्याच्या निर्मिती मागे तात्विक अधिष्ठानाची गरज असते. भगवान बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचे अधिष्ठान दलित नाट्यरंगभूमीस लाभले आहे. या रंगभूमीला उज्ज्वल करणारे अनेक नाटककारांचे योगदान असले तरी प्रा. दत्ता भगत यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागते. मानवतावादी विचार, वेदना, विद्रोह, नकार आणि नव्या जीवनमूल्यांचा स्वीकार, दलित समाजाचे वास्तववादी जीवन प्रा. दत्ता भगत यांच्या नाटकामध्ये पाहावयास मिळते. प्रा. दत्ता भगत यांनी अनेक प्रकारचे लेखन केलेले असून त्यांनी आपल्या नाटकांमधून दलित समाजाचे वास्तव जीवन दाखविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.



Scanned with CamScanner

प्रा. दत्ता भगत यांनी 'खेळिया' या नाटकामधून दलितांच्या सामाजिक जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हजारो वर्षांपासून जातीयता भारतीयांच्या मनात खोलवर रूजलेली आहे. इथे जन्मणाऱ्याला आपोआपच जात, वर्ण मिळतो. प्रत्येक वर्णातील जातीची कामे ठरलेली असतात. इथल्या मनुप्रणीत समाजव्यवस्थेने शुद्रांना कसलाही अधिकार दिलेला नाही. त्यांना जनावरांपेक्षाही हीन दर्जाची वागणूक दिली गेली. या समान संधी नाकारणाऱ्या हिंदू व दलित समाजव्यवस्थेचे चित्रण प्रा. दत्ता भगत यांनी आपल्या नाटकामध्ये केलेले आहे. 'वाटा पळवाटा' हे अत्यंत गाजलेले नाटक. प्रस्तूत नाटकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने भारावलेल्या तीन पिढ्यांचे चित्रण दत्ता भगत यांनी केलेले आहे. मनुष्य आपल्या जातीमध्येच राहतो. तो सहसा बाहेर जात नाही आणि जे जातात त्यांना समाज व्यवस्था स्वीकारत नाही हे आपणास सतीश, अर्जुन, हेमा, दास राव व सोनल या सर्व पात्रांच्या माध्यमातून लेखकांनी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या नाटकामधून जातीयतेचे दर्शन घडते. सामाजिक उच्च-निचता व प्रतिष्ठा जपण्याचे नियम या समाजव्यवस्थेत कटाक्षाने पाळले जातात. विचार करण्याची पात्रता फक्त उच्च वर्णियांमध्ये आहे हा फोलपणा पात्रांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न दत्ता भगत यांनी केलेला दिसून येते.

**संदर्भ सूची**

१) दलित नाटक आणि रंगभूमी - ईश्वर नंदपूरे.

२) मराठी नाटक आणि रंगभूमी - वि.भा. देशपांडे.

३) नाट्यधर्मी मराठवाडा - त्र्यंबक महाजन.

४) आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी - दत्ता भगत.

Scanned with CamScanner